# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट - २०१६ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ऑगस्ट - २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शुक्रवार दिनांक ११/११/२०१६ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. इंग्रजी ३० श.प्र.मि या विषयाची परीक्षा १८/०८/२०१६ ते २०/०८/२०१६ व मराठी व हिंदी ३० या विषयाची परीक्षा २६/०८/२०१६, २७/०८/२०१६ व २९/०८/२०१६ राज्यातील एकूण १०८ केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे / गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व व मुंबईसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधीत संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन चलनाने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. ०५००१०२१०००००३४ मध्ये कोणत्याही शाखेत दिनांक २५/११/२०१६ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ३०श.प्र.मि<br>हिंदी ३० श.प्र.मि | ११३६० | ९४७६ | १८३९ | २४९७ | ६९७९ | ४५ | २६.३५% |
| इंग्रजी ३० श.प्र.मि | २०१९९ | १७३७० | २७८१ | ६४३६ | १०९३४ | ४८ | ३७.०५% |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१